# श्री. यमाई देवी ट्रस्ट, कनेरसर,
# ता. खेड, जि. पुणे.
# (रजि.क्र. ए. १२६६/पुणे.)

---

दिनांक : 06/12/2021

## "भाविकांना अहवान"

संदर्भ :— श्री. यमाई देवस्थान प्रशासक समिती यांची दिनांक 03/12/2021 रोजीची सभा व त्यातील ठराव.

सर्व भाविक भक्तांना सूचित करण्यात येते की, श्री. यमाई देवी ट्रस्ट, कनेरसर ही नोंदणीकृत विश्वस्त संस्था असुन तिचा नोंदणी क्रमांक र.नं.ए. 1266/पुणे सन 1969 असा आहे. सदरील देवस्थानचा कार्यभार पाहण्यासाठी मा. सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांच्या दिनांक 20/01/2020 च्या न्यायनिर्णयाप्रमाणे प्रशासक समितीची नेमणुक केली आहे. त्या आदेशाप्रमाणे दिनांक 08/02/2020 पासुन देवस्थानचा कारभार पाहण्यासाठी शासकीय प्रशासक समिती कार्यरत आहे. सदरील प्रशासक समितीत— दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग—खेड—राजगुरुनगर, धर्मादाय निरिक्षक—पुणे, तहसिलदार—खेड, पोलीस निरिक्षक—खेड व सरपंच—कनेरसर हे अनुक्रमे अध्यक्ष, सचिव व संचालक आहेत.

प्रशासक समितीने नेमणुकीच्या दिनांकापासुन ते आजपर्यंत देवस्थानचा कारभार हा अत्यंत पारदर्शकपणे केला आहे. प्रशासक समितीने देवस्थानचा कार्यभार हातात घेतला तेव्हा देवस्थानच्या सर्व बॅंक खात्यात जवळपास 11,50,000/— (अक्षरी साडे अकरा लाख रुपये) शिल्लक होती. प्रशासक समितीने फेब्रुवारी—2020 मध्ये देवस्थानचा कार्यभार हातात घेतल्यानंतर लगेच 23/03/2020 पासुन शासन निर्णयाप्रमाणे कोरोना लॉकडाउन सुरु झाले व मंदिर भाविकांसाठी बंद झाले.

त्यानंतर दिनांक 16/11/2021 रोजी मंदिर शासन निर्णयाप्रमाणे परत भाविकांसाठी सुरु झाले. परंतु परत दिनांक 03/04/2021 पासुन शासन निर्णयाप्रमाणे कोरोना लॉकडाउन सुरु झाले व मंदिर भाविकांसाठी बंद झाले. परत दिनांक 07/10/2021 पासुन शासन निर्णयाप्रमाणे मंदिर भाविकांसाठी सुरु झाले व आजपर्यंत ते सुरु आहे.

वर नमुद परिस्थिती असतांना देखील, प्रशासक समितीने आजपर्यंत जवळपास रुपये 15,00,000/— (अक्षरी पंधरा लाख रुपये फक्त) ची विकासकामे मंदिर परिसरात केली आहेत. तसेच, दिनांक 08/02/2020 पासुन कर्मचा—यांच्या पगारावर अंदाजे 06,35,000/— (अक्षरी सहा लाख पस्तीस हजार रुपये फक्त) खर्च केले आहेत.

वर नमुद खर्च वगळता, प्रशासक समितीच्या अल्प कार्यकाळात, आज रोजी देवस्थानच्या बॅक खात्यात जवळपास 30,00,000/— (अक्षरी तीस लाख रुपये फकत) रक्कम शिल्लक आहे व रुपये 15,00,000/— (अक्षरी पंधरा लाख रुपये फक्त) सुरक्षा ठेव आहे. म्हणजे एकुण 45,00,000/— (अक्षरी पंचेचाळीस लाख रुपये) एवढी रक्कम देवस्थान कडे आज रोजी शिल्लक आहे. वर्तमानपत्रातील बातम्यांनुसार महाराष्ट्रातील मोठी—मोठी मंदिरे कोरोना काळात तोटयात असल्याच्या बातम्या आपण वाचल्या असतील परंतु भाविकांना हे आम्ही अभिमानाने सांगु इच्छितो की, आमच्या पारदर्शक कारभारामुळे श्री. यमाई देवस्थान ट्रस्ट, कुठल्याही आर्थिक तोटयात नाही. यासाठी भाविकांनी देखील आम्हाला देणगीरुपी भरघोस मदत केली आहे. यासाठी भाविकांचे मानावे तेवढे आभार कमी आहेत.

प्रशासक समिती दिनांक 08/02/2020 पासुन श्री. यमाई देवस्थानचा कारभार अत्यंत पारदर्शक व प्रामाणिकपणे पार पाडत आहे. या सर्व कारभाराचे दस्ताऐवज व नोंदी प्रशासक समितीकडे आहेत. प्रशासक समिती देवस्थानच्या पैशातुन रक्कम रुपये 02,000/— वरील सर्व खर्च धनादेशाव्दारे किंवा बॅक प्रणाली मार्फत करते. तसेच, आलेल्या देणगीचा योग्य तो चोख हिशोब ठेवला जातो.

या ठिकाणी हे ही नमुद करणे गरजेचे आहे की, देवस्थान प्रशासक समितीने कार्यभार हातात घेतल्यानंतर देवस्थानच्या जमीनीवर होणा—या अतिक्रमणाविरुध्द कठोर पावले उचलली, देवस्थानच्या जमीनीची मोजणी करण्यासाठी शासकीय भुमापक यांना रितसर अर्ज केला व लवकरच सदरील मोजणी पुर्ण होईल व त्यानंतर या संदर्भात पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच, प्रशासक समितीने देवस्थानच्या जमीनीवरील गाळेधारकांकडुन आतापर्यंतच्या थकित भुई भाडेपैकी जवळपास रक्कम रुपये 10,00,000/— (अक्षरी दहा लाख रुपये फक्त) वसुल केले आहेत व सर्व गाळे धारक यांचा खासगी भुमापकाव्दारे सर्व्हे करुन योग्य

ती माहिती पुढील कायदेशीर बाबींची पुर्तता करण्यासाठी संकलीत केली आहे.

भुईभाडे वसुल करतांना व मंगलकार्यालयाचे भाडे घेतांना संबंधीतांना सदरील रक्कम देवस्थानच्या युनियन बॅंक ऑफ इंडिया, शाखा कनेरसर या बॅंक खात्यात जमा करण्यास सांगण्यात आले व हीच पध्दत या पुढेही चालु राहील. देवस्थान प्रशासक समितीतील सदस्य हे नेहमीच देवस्थानच्या कारभार पाहतांना रक्कम खर्ची घालण्यासाठी किंवा जमा करण्यासाठी देवस्थानच्या बॅंक खात्याचा व बॅंक प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करतात. फक्त किरकोळ खर्च हा रोख रकमेतुन करण्यात येतो.

प्रशासक समितीने कुठलाही अनुचित प्रकार रोखण्यासाठी आपल्या कार्यकाळात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे मंदिर परिसरात बसविले आहेत.

अशा प्रकारे श्री. यमाई देवस्थानचा कारभार प्रशासक समितीतील सदस्य पारदर्शक व प्रामाणिकपणे पाहत असतांना, त्यांनी आज पर्यंत सर्व यात्रा महोत्सव यांचे कोरोना नियम पाळुन यशस्वी आयोजन केले. हे सर्व करत असतांना, प्रशासक समिती देवस्थानच्या दिनांक 13/07/2010 च्या घटनेतील तरतुदींना अधीन राहुन, ग्रामस्थांची व सरकारी अधिका–यांची मदत योग्य त्या वेळी व योग्य त्या कामासाठी घेतात. तसेच मंदिर हे सार्वजनिक ठिकाण असल्यामुळे मंदिरामध्ये ग्रामस्थ, भाविक व इतर सर्व व्यक्ती हे स्वेच्छेने दर्शनासाठी किंवा सेवा देण्यासाठी येतात. तसेच मा. सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांनी पुर्वीच्या विश्वस्थांच्या बरखास्तीचा आदेश देतांना कोठेही असे नमुद केले नाही की, त्यांना यापुढे मंदिरात प्रवेश बंदी आहे. मंदिर हे सार्वजनिक ठिकाण असल्यामुळे, मंदिर सुरु असतांना, त्या ठिकाणी कोणालाही प्रवेश नाकारता येत नाही.

असे असतांना देखील, मागील जवळपास एक वर्षापासुन काही अ–सामाजिक तत्वाचे लोक यांनी श्री. यमाई देवस्थान व प्रशासक समितीतील सदस्य यांना यू–टयुब, वृत्तपत्रातील बातम्या व इतर समाजमाध्यमांतुन बदनाम करण्याची मोहिम उघडली आहे. या मोहिमेचा भाग म्हणुन, सदरील लोक देवस्थान प्रशासक समितीवर अत्यंत तर्कहीन, बिनबुडाचे व परस्पर विसंगत असे आरोप करत असतात. सदरील लोक गावात घडलेल्या कुठल्याही घटनेचा संबंध हा देवस्थान प्रशासक समितीशी लावुन देवस्थानास बदनाम करतात.

हल्ली जे व्यक्ती आरोप करत आहेत त्यांच्याकडे कुठले पुरावे असल्यास त्यांनी सक्षम न्यायालय किंवा अधिका—यासमोर ठेवावेत. या अनुषंगाने होणा—या चौकशीत देवस्थान प्रशासक समिती योग्य ते सहकार्य करेल. परंतु, सध्यातरी नाहक होणा—या आरोपांमुळे भाविकांमध्ये विनाकारण संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सर्व पार्श्वभुमीवर देवस्थान प्रशासक समितीची दिनांक 03/12/2021 रोजी बैठक झाली. सदरील बैठकीमध्ये उपस्थित असलेल्या सदस्यांमध्ये सर्वानुमते असे ठरले की, श्री. यमाई देवस्थान, कनेरसर यांची जाणीवपुर्वक बदनामी करणा—या व्यक्तींविरुध्द मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, पुणे यांच्याकडे रितसर तकार करावी व संबंधीतांनी देवस्थानची बदनामी पुढेही चालु ठेवल्यास त्यांच्या विरुध्द सर्व कायदेशीर बाबींचा विचार करुन मानहाणीचा दावा सक्षम न्यायालयात दाखल करावा.

तरी सर्व भाविकांना नम्र अहवान करण्यात येते की, त्यांनी कुठल्याही अपप्रचाराला बळी पडु नये. श्री. यमाई देवस्थान प्रशासक समिती ही देवस्थानच्या पारदर्शक व प्रामाणिक कारभारासाठी तसेच देवस्थानच्या विकासासाठी कटिबध्द आहे.

सर्व भाविक भक्तांचे श्री. यमाई देवी चरणी नेहमीच सहर्ष स्वागत!

आपले;
प्रशासक समिती,
श्री. यमाई देवी मंदिर, कनेरसर,
ता. खेड, जि. पुणे.